आत्मदीपो भव।

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

# मंदिर व्यवस्थापन पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी क्षमता संवर्धन कार्यक्रम



भारतीय संस्कृतीच्या उगम आणि विकासात देवस्थानांचा मोलाचा वाटा आहे. देवस्थानांच्या माध्यमातून आजपर्यंत ज्ञान प्रसार, धर्मप्रसार, धर्मरक्षण या विषयी कार्य होत आहे. समाजातील सर्व व्यक्तींना एक अध्यात्मिक व सांस्कृतिक उन्नतीचे व्यासपीठ देवस्थानांद्वारे व त्यातील निरनिराळ्या उत्सवांमुळे प्राप्त होते. यात्रा, उत्सव या माध्यमातून सामाजिक एकता तसेच समाज संघटन व सहयोग साधला जातो. मंदिरे ही एक सामाजिक ऊर्जा देणारी केंद्रे आहेत.




## प्रशिक्षण कशासाठी?

मंदिरे ही भक्तांच्या हृदयातील श्रध्दा आणि विश्वास दृढ करतात. त्यामुळे मंदिरात होणारी नियमित पूजा, मंदिरात येणाऱ्या भाविकांना मिळणाऱ्या चांगल्या सुविधा, स्वच्छता, दर्शन, प्रसाद, भोजन, निवास, वाहनस्थळ, वृध्द व अपंग भक्तांसाठी विषेश व्यवस्था, सामाजिक कार्यातील सहभाग इ. विषयांचा त्या त्या मंदिराच्या व्यवस्थापन समितीने बारकाईने अभ्यास केला पाहीजे. मंदिरांचा कारभार पारदर्शक असण्याबरोबरच मंदिरांच्या कारभारात कालसुसंगत गुणात्मक सुधारणा होणेही आवश्यक आहे.

## प्रशिक्षणाचे महत्व

कोणत्याही संस्थेची ताकद ही तिच्या व्यवस्थापनावर अवलंबून असते. मंदिर प्रशासनाला अनेक समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. त्यावरील उपाय आणि अन्य अनुषंगीक विषय समजून घेणे.

## प्रशिक्षण कोणासाठी?

- मंदिरांच्या विश्वस्थ मंडळातील पदाधिकारी.
- मंदिरातील कर्मचारी वर्ग आणि या क्षेत्रात आवड असणाऱ्या व्यक्तींसाठी.

## प्रशिक्षणातील विषय:

- मंदिर व्यवस्थापन मंडळाची भूमिका आणि जबाबदारी (मंदिरांचे संचालन, व्यवस्थापन आणि प्रशासन).
- मंदिर वास्तुकलेचे जतन, प्रबोधन, कार्यक्रम, कायदा व सुव्यवस्था.
- आधुनिक काळातील मंदिरांची सामाजिक भूमिका आणि जबाबदारी.
- मंदिरांच्या सुरक्षिततेसाठी व्यावसायिक व आपात्कालीन व्यवस्थापन.
- घनवचरा व्यवस्थापन आणि मूलभूत सुविधा.
- विविध सेवा कार्य व समाजाभिमुख उपक्रम.
- मंदिरांचा विकास व मंदिर कार्यांचा प्रचार आणि प्रसार.
- सण आणि उत्सवाच्या दिवसांमध्ये गर्दीचे नियोजन.
- मंदिर कार्यालय व्यवस्थापन.
- मंदिर आस्थापनेची धोरणे, नियम आणि कायदेशीर पालन.
- परस्पर संबंध आणि सकारात्मक दृष्टिकोन.
- वेळेचे व्यवस्थापन.
- संवाद कौशल्ये, ताणतणाव नियोजन.
- समाजमाध्यमांचा योग्य उपयोग.



## इतर उपक्रम:

### निवासी पाठ्यवृत्ती:

१. विविध विषयांत रुची असणाऱ्या, अभ्यास करणाऱ्या व्यक्तींनी येथे येऊन संशोधन व अभ्यास करावा व आपल्या लेखनाद्वारे त्या त्या विषयातील अनेकविध पैलू पुस्तक रुपाने प्रकाशीत करावेत हा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

## वास्तव-दर्शन पाठ्यवृत्ती :

### पत्रकारांमध्ये सृजनशीलता विकसित करण्याचा अभिनव उपक्रम

१. उगवत्या पत्रकारांमध्ये संशोधनवृत्ती, सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांची जाणीव आणि सृजनशीलता व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, या उद्देशाने ही पाठ्यवृत्ती देण्यात येते. विविध सामाजिक प्रश्नांचा सांगोपांग अभ्यासही या निमित्ताने समाजापुढे मांडला जातो.

## प्रशिक्षणांची वैशिष्ट्ये:

१. केशवसृष्टी, उत्तन येथील निसर्ग सुंदर, अत्याधुनिक आणि सुसज्ज ज्ञान-नैपुण्य केंद्र.
२. उत्तम निवास आणि जेवणाची व्यवस्था.
३. प्रात्यक्षिकांसह चर्चात्मक पद्धतीने विषयांची मांडणी, तज्ञ मार्गदर्शक.

## प्रबोधिनीचा प्रशिक्षण परिसर

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे ज्ञान-नैपुण्य केंद्र हे १५ एकरांचे हिरवाईने नटलेले आणि टेकड्यांच्या मधोमध वसलेले एक निसर्गसुंदर ठिकाण आहे. निवासी प्रशिक्षणाचा अविस्मरणीय अनुभव देणाऱ्या या शांत परिसरातील ग्रंथालय व इतर प्रशिक्षण सुविधा स्वयं-शिक्षणाला प्रेरणा देतात आणि मनाला अंतर्मुख करतात.










### संपर्क:


**दिलीप शिवराम नवेले,** ग्रंथपाल
रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, संचालित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र ग्रंथालय (शासनमान्य)
दूरध्वनी क्र.: ९९६७४२९४५६ | dilipn@rmponweb.org

**मुंबई कार्यालय (नोंदणीकृत)**
१७, चंचल स्मृती, गं.द.आंबेकर मार्ग,
श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट समोर, वडाळा,
मुंबई – ४०० ०३१, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २४१३ ६९६६ / २४१८ ५५०२ / २४१५ ६७२५
ई मेल -rmpchanchal@rmponweb.org

**ज्ञान–नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण संकुल)**
केशव सृष्टी, उत्तन, एस्सेल वर्ल्ड रोड, भाईंदर (पश्चिम)
जि. ठाणे – ४०१ १०६, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २८४५ ०१०१ / २ / ३ / ६
ई मेल -samparka@rmponweb.org